# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे महानगरपालिका
**{परिवहन विभाग}** अधिनियमांतर्गत कलम 97 व 98 अन्वेय परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प ‘‘ब’ तयार करण्याचे तरतुदी नुसार सन 2024-25 चे सुधारित अंदाजपत्रक व सन 2025-26 चे प्रस्तावित अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने सन 2025-26 चे प्रस्तावित अर्थसंकल्प ‘‘ब’ यांस मा. प्रशासक महानगरपालिका नागपूर यांचे द्वारे मान्यता करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 1310/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 21 /03/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परिवहन व्यवस्थापक, परिवहन विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे महानगरपालिका अधिनियमांतर्गत कलम 97 व 98 अन्वेय परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प ‘‘ब’ तयार करण्याचे तरतुदी नुसार सन 2024-25 चे सुधारित अंदाजपत्रक व सन 2025-26 चे प्रस्तावित अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने सन 2025-26 चे प्रस्तावित अर्थसंकल्प ‘‘ब’ च्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.